MHBI120004842020

## नियमीत दिवाणी दावा क्र.१००/२०२० मधील नि.क्र.३६ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांना लेखी कैफियत दाखल करणेस झालेला उशीर माफ करून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. उपरोक्त प्रतिवादी क्र.१ यांनी असे नमुद केले आहे की, प्रतिवादी क्र.१ हे दाव्यामध्ये हजर झालेले आहेत. परंतु प्रतिवादी क्र.१ यांनी वेळेत आपली लेखी कैफियत व म्हणणे दाखल न केल्यामुळे मा.न्यायालयाने दिनांक २९.०९.२०२२ रोजी प्रतिवादी यांचे विरूध्द विना लेखी कैफियत दावा चालविण्याचा आदेश पारित केलेला आहे. प्रतिवादी क्र.१ यांना महत्वाची कागदपत्रे न मिळाल्यामुळे प्रतिवादी क्र.१ हे आपला जबाबदावा मुदतीत दाखल करू शकले नाहीत. प्रतिवादी क्र.१ यांचा जबाब दावा दाखल करून घेतला नाही तर प्रतिवादी क्र.१ यांचे न भरून येणारे नुकसान होईल व प्रतिवादी क्र.१ यांना त्यांचे न्याय हक्कापासून वंचीत व्हावे लागेल. सबब, सदर प्रतिवादी क्र.१ ची कैफियत दाखल करण्यास झालेला उशीर माफ करून प्रतिवादी क्र.१ यांची लेखी कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी क्र.१ यांनी केली आहे.

३. अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल करुन प्रतिवादी क्र.१ यांनी अर्जात संयुक्तीक कारण नमूद केले नसल्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र.१ यांच्या विरुध्द दिनांक २९.०९.२०२२ रोजी विना लेखी कैफियत आदेश झालेला आहे. समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांनी विहीत मुदतीत हजर होवून त्यांची कैफियत व म्हणणे दाखल केले नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यास संयुक्तीक कारण दर्शविले

आहे. तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.१ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत अभिलेखावर न घेतल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रस्तुत प्रकरणातील वाद विषय व झालेला विलंब लक्षात घेता वादी यांना खर्चाची रक्कम रु.१००/- देणे न्यायोचित होईल. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांना रक्कम रु.१००/- एवढा खर्च दिल्यानंतर त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी सदर खर्चाची रक्कम न चुकता पुढील तारखेस अथवा त्यापूर्वी वादी यांना अदा करावी. |

NILESH MALAKAPPA WALI
Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2025.10.31 11:38:04 +0530

स्थळ-धारुर
दिनांक ३०.१०.२०२५

(एन.एम.वाली )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, धारुर

:: **Certificate of Stenographer** ::

“ I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order/judgment. ”

Sd/-
(Amol D. Mule )
Stenographer (Grade – 3)
C.J.J.D. & J.M.F.C. Court, Dharur